## निशाणी क्र. २५३ वरील आदेश

मयत प्रतिवादी क्रमांक १ ते ३ व ५ चे वारस व प्रतिवादी क्रमांक ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्याच्या विरुद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून वादींतर्फे साक्षीदार क्रमांक १ चा उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे वाटप होणेस्तव प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना वादी साक्षीदार क्रमांक १ चा उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. अशा स्वरुपाच्या दाव्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत वाद मुद्दयांची सुनावणी ही गुणावगुणावर होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. जरी याकामी प्रतिवादी यांच्या कडून विलंब व चूक झाली असेल तरी देखील सदर प्रकरणाचा निकाला गुणावगुणावर होण्यासाठी त्यांना एक शेवटची संधी देणे न्यायोचित वाटते.

४. प्रतिवादींविरुद्ध वादींतर्फे साक्षीदार क्रमाक १ चा उलटतपास नाहीचा आदेश दिनांक १३/०९/२०१६ रोजी झाला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १२/०७/२०२२ रोजी दाखल केला आहे. हा आदेश झाल्यापासून जवळपास ५ वर्ष ०९ महिने ३० दिवस एवढया विलंबाने हा अर्ज दिलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा दहा वर्षांहून

जुना आहे. इतक्या जुन्या दाव्यामध्ये प्रतिवादींची ही विलंब करण्याची वर्तनुक योग्य नाही. या विलंबाची नुकसान भरपाई वादींना होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादींना खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश पारित करणे योग्य होईल असे वाटते. परिणामी, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत प्रस्तुत प्रतिवादींनी रुपये ३,०००/–(रु. तीन हजार फक्त) खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी रुपये १५००/– (रु. एक हजार पाचशे फक्त) वादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. वरील प्रमाणे पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादींविरुद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो व प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2022.09.03 15:58:42 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक : ०१/०९/२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.